1

## दिनांक ३०/०८/२०१४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेचे इतिवृत्त

आरोग्य समितीची सभा दिनांक ३०/०८/२०१४ रोजी दुपारी १.०० वाजता मा.श्री मनमोहनसिंग अमरसिंग चव्हाण सभापती आरोग्य व शिक्षण समिती यांचे अध्यक्षतेखाली घेण्यात आली. सभेस खालील सन्मा.सदस्य व अधिकारी कर्मचारी उपस्थित होते.

—: सर्व श्री. सन्माननीय :—

| अकं | उपस्थित सर्व सन्मा सदस्य यांची नांवे | पद |
|---|---|---|
| १ | मा.श्री.मनमोहनसिंग अमरसिंग चव्हाण | सभापती |
| २ | सन्मा.सौ.ज्योतीताई जि.ठेंगे | सदस्य |
| ३ | सन्मा.सौ.आरतीताई ह. फुपाटे | सदस्य |
| ४ | सन्मा.सौ.निलीमाताई म.गोहणे | सदस्य |
| ५ | सन्मा.प्रविण बाबारावजी उईके | सदस्य |
| ६ | सन्मा.सौ.लताताई पांडुरंग खांदवे | सदस्य |
| ७ | सन्मा.सौ.सुलोचनाताई मो. भोयर | सदस्य |
| ८ | सन्मा.श्री.पंढरीभाउ हरिभाउ सिंहे | सदस्य |
| ९ | डॉ. के.झेड्.राठोड | सचिव तथा जिआअ |

—: अधिकारी व निमंत्रीत:—

| अकं | अधिकारी व कर्मचारी यांचे नांव | पद |
|---|---|---|
| १ | डॉ.डी.डी. भगत | सहायक संचालक (कुष्ठरोग) |
| २ | श्री.एस.एस.तुंबडे | इस्टेट ऑफिसर डि.डी कार्या.अकोला |
| ३ | डॉ.एस.एम. तरोडेकर | जिल्हा हिवताप अधिकारी यवतमाळ |
| ४ | डॉ.मोहन खडतकर | ताआअ बाभुळगांव |
| ५ | डॉ.के. आर. गुजर | वै.अ |
| ६ | डॉ.विरेंद्र श्रीवास्तव | ताआअ महागांव |
| ७ | डॉ.अविनाश देशमुख | ताआअ कळंब |
| ८ | डॉ संजय जिद्येवार | ताआअ राळेगांव |
| ९ | डॉ.विजय उमरे | ताआअ घांटजी |
| १० | डॉ.आशिष पवार | ताआअ पुसद |
| ११ | डॉ.एस.एम.मडावी | ताआअ झरी |
| १२ | डॉ.संजय तोडासे | ताआअ वणी |
| १३ | डॉ.रविंद्र दुर्गे | ताआअ नेर |
| १४ | डॉ.सुषमा खोडवे | ताआअ यवतमाळ |
| १५ | डॉ.सि.एस.भोंगाडे | ताआअ दिग्रस |
| १६ | डॉ.विजय गांवडे | ताआअ मारेगांव |
| १७ | डॉ. उमेश मडावी | ताआअ आर्णी |
| १८ | डॉ. गोपाळ पाटिल | ताआअ पांढरकवडा |
| १९ | डॉ.पि. डी. देशमुख | .ताआअ उमरखेड |
| २० | श्री.जे. यु. ढोक | प्रति. ताआअ दारव्हा |
| २१ | श्री.एस.एम. सवने | मु.अ.शा.जि.आ. प्रयोगशाळा |
| २२ | श्री.लिलेश साखरवाडे | उपअभियंता बांधकाम एनआरएचएम |
| २३ | श्री.एस.एम.राघमवार | उपअभियता बा.वि.कळंब |
| २४ | श्री.जि.एस. भारशंकर | शा.अ.विद्युत बा.वि. कमांक २ जि.प |
| २५ | श्री.ए.ए.धकाते | शा.अ.विद्युत बा.वि. कमांक १ जि.प |
| २६ | श्री.गणेश घंटेवार | प्रति.अपअभियंता कार्या.वणी |
| २७ | श्री.सुनिल अवस्थी | प्रति,क्षयरोग कार्या.यवतमाळ |
| २८ | श्री.राहुल मनियार | डिपीएम एनआरएचएम |
| २९ | श्री.एस.आर. अवझाडे | नेत्रचिकित्सक सि.एस.कार्यालय |

(२)

| | | |
|---|---|---|
| ३० | श्री.डि.एम. ठाकरे | आ.सहा |
| ३१ | कु.सुजाता बोरकर | सिकलसेल कोऑडिनेटर |
| ३२ | श्री.अरूण नक्षणे | स्विय सहायक मा. सभापती आ.समिती |
| ३३ | श्री.जी.सी. शेंडे | आ.सहा ताआअ कार्यालय पांढरकवडा |
| ३४ | श्री.एस.एच.जाधव | प्र.तत्रज्ञ आर्णी |
| ३५ | श्री.व्ही.जी.चहाकर | आ.सहा. आ.विभाग |
| ३६ | श्री.ऐ.के. गावंडे | व.सहा आरोग्य विभाग नियोजन शाखा |

सर्वप्रथम सचिव तथा जि.आ.अ यांनी सर्व उपस्थितांचे स्वागत केले.स्वागत केल्यांनतर मा. अध्यक्ष यांचे परवानगीने विषय पत्रिकेवरील विषयानुसार सभेला सुरूवांत केली.

विषय क्रमांकः–१ :–दिनांक ६.०८. १४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या अहवालांचे वाचन करणे व त्यांस कायम करून मंजुरात प्रदान करणे बाबत

दिनांक ६.०८..२०१४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या अहवालाच्या प्रती सर्व उपस्थित सन्मा सदस्यांना देण्यांत आल्या ,अहवालंचे वाचन सपल्यानंतर सन्मा.सदस्यांनी खालील मुद्दे उपस्थित करून चर्चा केली व मा. सभापती आरोग्य समिती यांनी सचिव तथा जिआअ यांना आवश्यक ते निर्देश दिले.

१) सन्मा.सौ.सुलोचनाताई मो. भोयर :– यांनी आयुर्वेदिक दवाखाना बांणगांव येथील बांधकामा बाबत विचारणा करून त्वरीत सदर बांधकाम सुरू करण्या बाबत बांधकाम विभागांनी कार्यवाही करावी अशी माहिती सभागृहांस दिली.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी आयुर्वेदिक दवाखाना बांणगांव येथील काम त्वरीत सुरू करण्या बाबत शा.अ बा. वि. क्रमांक २ व नियोजन शाखा आरोग्य विभागास निर्देश दिले.

तसेच सन्मा. सदस्यांनी मौजे चिकणी (डोमगा) येथील जागा प्राप्त करून घेण्याबाबत ताआअ नेर यांनी त्वरीत कार्यवाही करावी अशी माहिती सभागृहांस देउन त्याबाबत कार्यवाही करण्यांची मागणी केली.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी उपरोक्त प्रकरणी ताआअ नेर यांनी त्वरीत कार्यवाही करण्यांचे निर्देश दिले.

२) सन्मा.श्री.प्रविण बा. उईके यांनी :– प्राआकेंद्र बेलोरा ता. यवतमाळ येथील इमारतीचे त्वरीत निर्लेखन करण्याची कार्यवाही करून नविन इमारत बांधण्या बाबत त्वरीत कार्यवाही करावी अशी माहिती सभागृहांस दिली.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी प्रा.आ.केंद्र बेलोरा ता. यवतमाळ येथील निर्लेखनाची कार्यवाही करून त्या ठिकाणी नविन इमारत बांधकाम करण्या बाबत शा.अ बा.वि. क्रमांक २ व नियोजन शाखा आरोग्य विभागास निर्देश दिले.

३) सन्मा. सौ. निलीमाताई म. गोहणे :– यांनी मौजे घोटी येथील जागेबाबत मुद्दा उपस्थित करून घोटी येथे १०००० स्केअरफुट जागा आहे.परंतु अतिक्रमाणामुळे सदर जागा ही ६००० स्केअरफुट एवढीच आहे.त्यूळे जेवढी जागा प्राप्त आहे तेंव्हीच जागा एक महिण्यांचे आंत ग्रा.प. कडुन प्राप्त करून घेण्यांची कार्यवाही तसेच मेंढला येथील जागा प्राप्त करून घेण्या बाबत ताआअ कळंब यांनी करून घ्यावी अशी माहिती सभागृहांस देउन त्वरीत कार्यवाही करण्यांची मागणी केली.

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी उपरोक्त दोन्हीही प्रकरणी त्वरीत कार्यवाही करण्यांचे निर्देश ताआअ कळंब यांना दिले.

४) मा. सभापती आरोग्य समिती यांनी :– मा. सभापती आरोग्य समिती यांनी :– मौजे तिवसा येथील काम रद्द करण्यांबाबत नियोजन शाखा आरोग्य विभागास निर्देश दिले.

त्याचप्रमाणे सभागृहांत महागांव/मांगकिन्ही येथील पाणी पुरवठयाचे कामा बाबत चर्चा होत असतांना शाखा अभिंयता (विद्युत)बा.वि.क.१ यांनी त्या बाबत सविस्तर माहिती देउन, प्राआकेंद्र सिरसगांव येथे पाणीपुरवठयांचे सुविधा उपलब्ध करून देण्याकरिता ज्या ठिकाणावरून पाणी घ्यावयाचें आहे त्या ठिकाणचे अंतर जास्त आहे त्यामुळे पाणी पुरवठा करण्यांस अडचण निर्माण होईल अशी माहिती दिली यावर सचिव तथा जिआअ यांनी प्राआकेंद्र सिरसगांव येथे भुमिगत पाणी साठवणुक टॅक केल्यांस त्यामधुन पाणीपुरवठा करणे सोईचे होईल असे सागीतले यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी याकरिता सन्मा.सदस्य सौ.सुलोचनाताई मो. भोयर यांचे सहकार्य घेउन संयुक्त पाहणी करून यावर काय तोडगा निघतो त्या प्रमाणे पुढील कार्यवाही करणे सोईचे होईल असे सभागृहांत प्रतिपादन केले .

तसेच महागांव व मांगकिन्ही येथे प्रथम शा.अ (विद्युत) यांनी पाहणी करावी व त्यानुसार पाणी पूरवठयांची व्यवस्था करण्याबाबत त्वरीत कार्यवाही करावी असे निर्देश शा.अ (विद्युत) बा.वि. क.१ यांना निर्देश दिले.

यावर सचिव तथा जिआअ यांनी उपरोक्त सर्व पाणीपुरवठयांचे कामे का,अ पाणीपुरवठा यांचे कडे असलेल्या ११.७४ लाख निधीमधुन करता येईल का अशी उपअभियंता एनआरएचएम आरोग्य विभाग यांना विचारणा केली. यावर उपअभियंता एनआरएचएम यांनी वरील सर्व कामे सदर ११.७४ लाख निधीमधुन करता येईल अशी माहिती सभागृहांस दिली

यावर मा. सभापती आरोग्य समिती यांनी, उपअभियंता एनआरएचएम आरोग्य विभाग व शा.अ (विद्युत)बा.वि.क्र१ यांना सदर पाणीपुरवठयांचे कामे पुर्ण करण्यां बाबत निर्देश दिले.

त्याचप्रमाणे सभागृहांत जिल्हयांतील नविन प्राआकेद्राचे बांधकामा बाबत चर्चा होत असताना ,नविन प्राआकेंद्राचे बांधकाम त्वरीत सुरू करण्याबाबत शा.अ बा.वि.क्रमांक १ व २ व नियोजन शाखा आरोग्य विभाग यांनी त्वरीत कार्यवाही करावी असे निर्देश दिले.

५) मा.सभापती आरोग्य समिती यांनी :—उमरी ता. बाभुळगांव येथील जागा प्राप्त करून घेण्यांची कार्यवाही ताआअ बाभुळगांव यांनी करावी असे निर्देश दिले.

त्याचप्रमाणे उपकेंद्र पहुर ता. कळंब येथील उपकेंद्र इमारत हस्तांतरीत करणे बाबत त्वरीत कार्यवाही करण्यांचे निर्देश ताआअ कळंब यांना दिले.

.६) सभागृहांत आरोग्य विभागाअंतर्गत बांधकामाच्या कार्याच्या आढाव्यावंर व कामकाजावर चर्चा होत असतांना मा. सभापती आरोग्य समिती यांनी बांधकाम विभाग कमांक १अंतर्गत प्राआकेंद्र/उपकेंद्र बांधकाम/दुरूस्ती/पाणीपुरवठयांची सुविधाची कामे/किरकोळ दुरूस्ती तसेच बांधकामा संबधी सर्वच कामे वेळेवर कधीच पुर्ण केले नाही व करित नाही त्यामुळे हाती घेतलेले सर्वच कामे आजपावेतो पुर्ण झालेली नाही ,सभागृहात माहिती सुध्दा चुकिची दिल्या जाते व संबधीत अधिका—याकडुन त्या बाबत सहकार्य मिळत नाही तसेच उपस्थित सन्मा. सदस्यांनी सुचविलेले बांधकामा संबधी कार्यवाही केल्या जात नाही तेंव्हा आरोग्य विभागाअंतर्गत करण्यांत येणारी बांधकामे व इतर अनुषंगीक कामे वळेवर पुर्ण करण्यांस बांधकाम विभाग असमर्थ आहे तेंव्हा कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग कमांक १जि.प यांचे कडील सदर पदाचा प्रभार काढुन दुस—या कार्यकारी अभियंता यांना प्रभार देण्यांत यावा व कार्यकारी अभियता बा. वि. कमांक १ यांचेवर रितसर, नियमानुसार कारवाही करावी याकरिता आरोग्य समिती मध्ये ठराव घेउन ,सदर ठरांव जि.प. च्या सर्वसाधारण सभेमध्ये पुढील निर्णयास्तव सादर करावा अशी माहिती सभागृहांत दिली.

यावर उपस्थित सर्व सन्मा. सदस्य यांनी सविस्तर चर्चा करून,मा. अध्यक्ष आरोग्य समिती यांनी खालील प्रमाणे ठरांव मांडला.

ठरांव कमांक १ :—आरोग्य विभागाअतर्गत प्राआकेंद्र/उपकेंद्र बांधकाम/दुरूस्ती/पाणीपुरवठयांची सुविधाची कामे/किरकोळ दुरूस्ती तसेच बाधकामा संबधी सर्वच कामे वेळेवर कधीच पुर्ण केले नाही व करित नाही त्यामुळे हाती घेतलेले सर्वच कामे आजपावेतो पुर्ण झालेली नाही ,सभागृहात माहिती सुध्दा चुकिची दिल्या जाते व संबधीत अधिका—याकडुन त्या बाबत सहकार्य मिळत नाही तसेच उपस्थित सन्मा. सदस्यांनी सुचविलेले बांधकामा संबधी कार्यवाही केल्या जात नाही तेंव्हा आरोग्य विभागाअंतर्गत करण्यांत येणारी बांधकामे व इतर अनुषंगीक कामे वेळेवर पुर्ण करण्यांस बांधकाम विभाग असमर्थ आहे तेंव्हा कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक १ जि.प यांचे कडील सदर पदाचा प्रभार काढुन दुस—या कार्यकारी अभियंता यांना देण्यांत यावा व कार्यकारी अभियता बा. वि. कमांक १ यांचेवर रितसर, नियमानुसार कारवाई करावी याकरिता सदर प्रकरणांत निर्णय घेण्यांकरिता जि.प सर्वसाधारण सभा सक्षम असल्यामुळे आरोग्य समिती ही सदर प्रकरणांत निर्णय घेण्या करिता जि.प. सर्वसाधारण सभेमध्ये सदर विषय ठेवण्या करिता शिफारशीस्तव मान्यता प्रदान करते.

ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठरांव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला

सुचक :— सन्मा श्री. प्रविण बा. उईके

अनुमोदन :—सन्मा.सौ. लता पां.खांदवे

वरील सर्व प्रकरणी कार्यवाहीचे निर्देश देउन मा. अध्यक्ष यांनी खालील ठरांव माडला

ठराव क्र. १— दिनांक ०६./०८/२०१४ रोजी झालेल्या आरोग्य समिती सभेच्या इतिवृत्ताचे वाचन करण्यात आले व त्यांस मंजुरी देण्यात आली. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.२ शासन परिपत्रकाचे वाचन करणे.

सचिव तथा जिआअ यांनी शासनाकडुन आरोग्य विभागाअंतर्गत शासन परिपत्रक ,शासन निर्णय प्राप्त झाले नाही अशी माहिती दिली.

विषय क्र. ३ :—माहे जुलै—१४ अखेरपावेतो कुटुंब कल्याण कार्यक्रमा अतंर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती सचिव तथा .जि.आ..अ. यांनी खालील प्रमाणे सादर केली.

| अक्र | विवरण | वार्षिक लक्ष | मासिक कार्य | प्रगतीपर कार्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | कु.क.शस्त्रक्रिया | १५६००० | ३७४ | १२२६ | ८ |
| २ | तांबी | १०५५९ | ५५७ | २११९ | २० |
| ३ | गर्भनिरोधक गोळया | ९५६१ | २९० | ४९०० | ५१ |
| ४ | निरोध (युझर्स) | ०० | ११०६० | ३९४२७ | ०० |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन .मा. अध्यक्ष,आरोग्य समिती यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला

ठराव क्र. २ :— माहे जुलै—१४ अखेरपावेतो कुटुंब कल्याण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.४ :— माहे जुलै—१४ अखेरपावेतो माताबाल संगोपन व सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमा अतंर्गत कार्याचा आढावा घेणे. सदर कार्याची माहिती सचिव तथा. जि.आ.अ.यांनी खालील प्रमाणे सादर केली.

| अ.क्र. | विवरण | वार्षिक लक्ष | मासिक कार्य | प्रगतीपर कार्य | टक्के. |
|---|---|---|---|---|---|
| १ | डि.पी.टी. | ४४७६२ | ३६०१ | १४२१६ | ३२ |
| २ | पोलीओ | ४४७६२ | ३६३२ | १४९८४ | ३२ |
| ३ | मिझल्स | ४४७६२ | ४१२५ | १५७२३ | ३५ |
| ४ | बि.सी.जी. | ४४७६२ | २६७३ | १०३२९ | २३ |
| ५ | काविळलस | ४४७६२ | ३५६१ | १४१४७ | ३२ |
| ६ | टि.टि.गरोदर माता | ४९२३८ | ३१९० | १३१०३ | २७ |
| ७ | एफ.एस. मोठया गोळया | ४९२३८ | ४२६२ | १०६४८ | २२ |
| ८ | एफ.एस. लहान गोळया | २१६६८० | ३३३९ | ९१५६ | ४ |
| ९ | व्हिटॅमिन अ ५वा डोज | ४५६६१ | १२९१ | ५०१९ | ११ |

अपरोक्त कार्याचा आढाव्यावर चर्चा होवुन मा.अध्यक्ष, यांनी खालील ठराव मांडला

ठराव क्र.३– माहे जुलै–१४ अखेरपावेतो माताबाल संगोपन व सार्वत्रिक लसीकरण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.५ :– माहे जुलै–१४ अखेरपावेतो क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमाअतर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती प्रतिनिधी. जि.क्ष.अ कार्यालय यांनी खालील प्रमाणे सादर केली

| अ.क्र. | विवरण | नार्मप्रतिलक्ष लोकसंख्या | वार्षिक अपे.साध्य | मासिक अपे.उदिष्टये | माहे जुलै–१४ | प्रगतीपर | टक्के | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | नविनथुंकी दुषितरूग्णशोधणे | ५६प्रतिलक्ष लोकसंख्या | २३०८ | १९२ | ८४ | ३८१ | – | |
| २ | नविन थुंकी अदुषित रूग्ण शोधणे | ५६प्रतिलक्ष लोकसंख्या | २३०८ | १९२ | ७१ | २२९ | – | |
| ३ | जुने रिट्रीटमेंट केसेस | २८प्रतिलक्ष लोकसंख्या | ११५५ | ९६ | ३६ | १९८ | – | |
| ४ | फुफुसेत्तर क्षयरूग्ण | ११प्रतिलक्ष लोकसंख्य | ४६२ | ३९ | ५३ | २२२ | – | |
| ५ | एकुण क्षयरूग्ण | २८दशलक्ष लोकसंख्या | ६२३३ | ५१९ | २४४ | १०३० | – | |
| | | कॅट –१ | – | – | २०८ | ८३२ | – | |
| | | कॅट –२ | – | – | ३६ | १९८ | – | |
| | | कॅ ट –३ | – | – | २४४ | १०३० | – | – |
| | | – | – | – | ०० | ०० | – | – |
| | | थुंकी दुषित | – | – | १०७ | ५१५ | – | – |
| | | थुंकी अदुषित | – | – | ८४ | २९३ | – | – |
| | | फुफुसेत्तर | – | – | ५३ | २२४ | – | – |
| | | एकुण | | – | २२४ | १०३० | – – | |
| १ | उपचारामुळे बरे झालेले क्षयरूग्ण | ८५टक्केपेक्षा जास्त | – | – | ३३४ पैकी | २७५ (८२टक्के) | – | – |
| २ | मृत्यु झालेले क्षयरूग्ण | ५ टककेपेक्षा कमी | – | – | – | १८(५टक्के | – | – |
| ३ | उपचार सोडलेले क्षयरूग्ण | ५ टककेपेक्षा कमी | – | – | – | १४(४ टक्के) | – | – |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन .मा. अध्यक्ष,आरोग्य समिती यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला
ठराव क्र. ४:— माहे जुलै—१४ अखेरपावेतो क्षयरोग नियंत्रण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते.ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला

विषय क्र.६ :— माहे जुलै—१४ अखेरपावेतो हिवताप नियंत्रण कार्यक्रमांतर्गत कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती जिल्हा हिवताप अधिकारी यांनी खालील प्रमाणे सादर केली

| अक्र. | विवरण | वार्षिक लक्ष | मसिक कार्य | प्रगतीपरकार्य | टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १ | घरोघरी घेतलेले रक्तनमुने | २३३१४० | ३८१०० | १२५८२९ | १६३ |
| २ | दवाखान्यात घेतलेले रक्तनमुने | ९९९१६ | १७३३१ | ९००६२ | १७३ |
| ३ | सामुदायीक घेतलेले रक्तनमुने | ०० | ४१८ | ९४३ | ०० |
| ४ | एकुण बेरीज | ३३३०५६ | ५५८४९ | १७६८३० | १६७ |
| ५ | आढळलेले दुषित रक्तनमुने | ०० | ५६ | १५० | ०० |
| ६ | समुळ उपचार घेणारे रूग्ण | ०० | ५६ | १५० | ०० |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन .मा. अध्यक्ष,आरोग्य समिती यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला
ठराव क्र. ५— माहे जुलै—१४ अखेरपावेतो हिवताप नियंत्रण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

विषय क्र.७— माहे जुलै—१४ अखेरपावेतो कुष्ठरोग निमुर्लन कार्यक्रमा अंतर्गत कार्याचा आढावा घेणे.

सदर कुष्ठरोग निमुर्लन कार्यक्रमा अंतर्गत कार्याची माहिती ,सहायक संचालक (कुष्ठरोग)कार्यालय यांनी खालील प्रमाणे सादर केली

| अ.क्र. | दर्शक मुदयाचें नांव | मासीक | प्रगतिपर | प्रमाण |
|---|---|---|---|---|
| १ | शोधलेले नविन कुष्ठरूग्ण | २९ | १४२ | १६.०६ |
| २ | नविन कुष्ठरूग्णामध्ये स्त्रीया | १५ | ६५ | ४६ |
| ३ | नविन कुष्ठरूग्णामध्ये सांस.रूग्ण | १८ | ७५ | ५३ |
| ४ | नविन कुष्ठरूग्णामध्ये मुलांची संख्या | १ | ८ | ६ |
| ५ | नविन कुष्ठरूग्णामध्ये विकृतीचे रूग्ण | ० | ७ | ४.९३ |
| ६ | अनुसुचित जातीचे नविन कुष्ठरूग्ण | ५ | २८ | ९.४१ |
| ७ | अनुसुचित जमातीचे नविन कुष्ठरूग्ण | ६ | ३३ | ५.८६ |
| ८ | औषधोपचार मुक्त झालेले रूग्ण | ४४ | १५४ | ०० |
| ९ | विविध कारणांनी कमी झालेले रूग्ण | ० | ८ | ०० |
| १० | महिनाअखेर एकुण कियाशील रूग्ण | ०० | २८३ | ०० |
| ११ | कुष्ठरूग्ण अस्तित्व दर (पी.आर) | ०० | ०० | ०.९८ |

उपरोक्त कार्याच्या आढाव्यावर चर्चा होउन.मा. अध्यक्ष,आरोग्य समिती यांनी खालील प्रमाणे ठराव मांडला
ठराव क्र. ६:— माहे जुलै—१४ अखेरपावेतो कुष्ठरोग नियत्रंण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला

विषय क्र. ८ :—माहे जुलै—१४ अखेरपावेतो नेंत्रशस्त्रक्रीया कार्यक्रमा अंतर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती नेत्र चि. अधिकारी ,अंधत्व निवारण संस्था यांनी खालील प्रमाणे सादर केली अंधत्व निवारण कार्यक्रमातंर्गत जिल्हयाला २०१४—१५ या वर्षात ५०२५ चे लक्ष देण्यात आले होते. त्यानुसार माहे जुलै—१४ मध्ये ३८३ मोतिबिंदु शस्त्रक्रीया करण्यात आल्या.माहे जुलै—१४ अखेरपावेतो प्रगतीपर ९४७ असून त्याची टक्केवारी १९ आहे.

विषय क्र. ९ :—माहे जुलै—१४ अखेरपावेतो पाणी शुध्दीकरण कार्यक्रमातंर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्याची माहिती, मुख्य अणुजीव शास्त्रज्ञ जिल्हा आरोग्य प्रयोगशाळा यांनी खालील प्रमाणे सादर केली माहे जुलै—१४ मध्ये अणुजीव तपासणी करीता २०७८ पाणीनमुने घेण्यात आले त्यापैकी ३३६ पाणीनमुने दुषित आढळले त्याची टक्केवारी १२ ही आहे. त्याच प्रमाणे माहे जुलै—१४ मध्ये ब्लिचिंग पावडरचे ४६२नमुने घेण्यात आले त्यापैकी ९५ नमुने २० टक्कयापेक्षा कमी क्लोरीन असल्याचे आढळले त्याची टक्केवारी ४ ही आहे.

विषय क्र. १०:— माहे जुलै—१४ अखेर पावेतो सिकलसेल कार्यकमा अंतर्गत झालेल्या कार्याचा आढावा घेणे.

सदर कार्यकमा अंतर्गत झालेल्या कार्याची माहिती सिकलसेल कोऑर्डिनेटर (एनआरएचएम) आरोग्य विभाग यांनी.माहे जुलै—१४ मध्ये एकुण जिल्हयांला महिण्यांचे २५००० उध्दिष्ठ असुन सोल्युबीलीटी टेस्ट केलेल्या व्यक्तींची संख्या ७४६७ आहे.त्यामध्ये सोल्युबीलीटी टेस्ट सकारात्मक असलेल्या व्यक्तीची संख्या ३५४ एवढी आहे. तसेच इलेक्ट्रोफोरसीस टेस्ट करिता पाठवलेलया रक्त नमुन्यांची सख्या ३५४ आहे. सदर तपासणी मध्ये वाहक २५९,रूग्ण १२,नकारात्मक ८३ आहे. एकुण कार्डवाटपा मध्ये लाल कार्ड १२ ,पिवळे कार्ड २५९ व पांढरे कार्ड ७१९६ आहेत.अशी माहिती सभागृहांस सादर केली. सदर कार्याच्या आढाव्यावंर सभागृहांत सविस्तर चर्चा होउन खालील प्रमाणे ठरांव मांडला
ठराव क्र. ७:— माहे जुलै—१४ अखेरपावेतो सिकलसेल कार्यक्रमाच्या आढाव्यास ही सभा सर्वानुमते मंजुरात देते. ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

(६)

विषय क्र ११:–यवतमाळ जिल्हयांतील मुलीचे लिंग प्रमाण वाढ करणे बाबतकृ

सदर विषयांची माहिती सचिव तथा जिआअ यांनी,खालील प्रमाणे सादर केली की, माहे जुलै–१४ मध्ये तालुका महागांव मध्ये जन्म लिंग गुणोत्तर ( १००० पुरूष जन्मामागे स्त्रिजन्माचे प्रमाण ) प्रमाण हे ११८६ एवढे आहे सदर प्रमाण हे जिल्हयांतील इतर तालुक्यापेक्षा जास्त आहे तद्वतच त्यापाठोपाठ अनुक्रमे दिग्रस/कळंब/झरीजामणी/पांढरकवडा/घांटजीयेथील सुध्दा काम समाधानकारक आहे

तसेच आर्णी/नेर/दारव्हा/मारेगांव/पुसद/राळेगांव/उमरखेड/यवतमाळ या तालुक्यांत पुरूषांचे जन्मांचे तुलनेत स्त्रिजन्मांचे प्रमाण फारच कमी आहे.स्त्रिजन्मांचे प्रमाण वाढविण्याकरिता सदर तालुक्यांनी जास्त प्रयत्न करणे आवश्यक आहे .सदर कार्यक्रमांचे प्रमाणांत वाढ करण्यांबाबत प्रयत्न करणे आवश्यक असल्यांचे सांगुन मा. सभापती आरोग्य समिती यांनी जिल्हयांतील मुलींचे लिंग प्रमाण वाढ करण्यांबाबत ग्रामिण भागांतील जनतेत जनजागृती करणे अतिशय आवश्यक आहे जनजागृती करण्यांचे दृष्टीने विभागाने दक्षता घ्यावी असे सभागृहात प्रतिपादन केले. तसेच ज्या तालुक्यांत सेक्स रेशो मध्ये पुरूष जन्माचे तुंलनेत स्त्रिजन्माचे प्रमाण हे फारच कमी आहे. सदर प्रमाण वाढविण्या बाबत कार्यवाही करावी असे निर्देश मा. सभापती आरोग्य समिती यांनी उपस्थित सर्व ताआअ यांना दिले.

यावर सभागृहांत सविस्तर चर्चा होउन चर्चा होउन मा. अध्यक्षांनी खालील ठरांव मांडला

ठरांव क ८:–यवतमाळ जिल्हयांतील मुलींचे लिंग प्रमाण वाढ करणे बाबत ग्रामिण भागांतील जनतेने जनजागृती करणे आवश्यक आहे या करिता हि सभा सर्वानुमते मंजुरात देते व ठरांवावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठरांव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला.

विषय क्र.१२:–आरोग्य विभागांअतर्गत जुलै–१४ अखेरपावेतो झालेल्या बांधकामाच्या कार्याचा आढावा घेणे.

माहे जुलै–१४ अखेरपावेतो आरोग्य विभागांतर्गत झालेल्या प्रा.आ.केंद्र/उपकेंद्र बांधकाम व दुरूस्तीच्या कार्याची माहिती शा.अ.बांधकाम विभाग क्र.१ व २ यांनी आपआपल्या विभागांतील बांधकामाचा सविस्तर माहिती सभागृहात सादर केली. यामध्ये प्रा.आ.केंद्रे/उपकेंद्रा मधील किती कामे पुर्ण झालेली आहे व किती कामे प्रगतीपथावर आहे तसेच काही ठिकाणी जागा उपलब्ध न झाल्यामुळे जागा उपलब्ध होतांच नविन बांधकामे हाती घेण्यांत येईल त्याचप्रमाणे जी बांधकामे पुर्ण झालेली आहे त्या कामांस आरोग्य विभागांस हस्तांतरीत केल्यांचे सांगीतले.व काही किरकोळ कामे बाकी असल्यामुळे, त्वरीत आरोग्य विभागांस हस्तांतरीत करण्यांची कार्यवाही करण्यांत येईल अशी माहिती शा.अ बा.वि. क्र १ व २ यांनी सभागृहांत सादर केली.

विषय क्र.१३:–कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक १ व २ यांचे कडुन प्राप्त झालेल्या बांधकामाचे प्राकलनांस प्रशासकिय मंजुरात मिळणे बाबत

सचिव तथा जिआअ यांनी कार्यकारी अभियंता बांधकाम विभाग क्रमांक १ व २ यांनी त्यांचे संदर्भीय पत्र क्रमांक

१) का.अ यजिप/बांध–१/तांशा/आई/पत्र क्रं२० आरनिशी–४००९/१३ दि.२०.११.२०१३यांचे जा पत्र क्रमांक ४४ दिनांक २.७.१४

२) का.अ यजिप/बांध–२/ तांशा २/बानी/३९४१दिनांक ३०.६.२०१४.

३) का.अ यजिप/बांध–२/ तांशा २/यांचे जा पत्र क्रमांक क्यु/ दिनांक ३०.८..१४ अन्वये प्राप्त झालेले एकुण ३ प्राकलने प्रशासकिय मंजुरातीस्तव आरोग्य समिती समोर सादर करण्यांत येत आहे. अशी माहिती सभागृहांत सादर केली.

| अ. क्र | तपशिल | रक्कम | क्षेत्र | शेरा |
|---|---|---|---|---|
| १ | प्रा.आ.केंद्र पहुर येथील वॉलकम्पांउड, पेव्हीग ब्लॉकचे बांधकाम करणे | १५.०० लक्ष | बि.आदीवासी | – |
| २ | मौजा गहुली ता. पुसद येथील प्रसुतीगृहाच्या बांधकामांत सुधारीत प्राकलनांस प्रशासकिय मान्यता | २.९६ लक्ष | बि.आदीवासी | – |
| ३ | प्रा.आ.उपकेंद्र कु–हा ता. आर्णी येथे कम्पांउडवॉल ,सिमेंट रस्ता बांधकाम करणे | १४.१५ लक्ष | आदीवासी | – |

कार्यकारी अभियंता बांधकाम क्रं १ व २ यांनी, एकुण ३ प्राकलने प्रशासकिय मंजुरात प्राप्त करण्यांसाठी आरोग्य समिती समोर सादर केलेले आहे. उपरोक्त प्राकलनाची कामे मा. सहसंचालक आरोग्य सेवा संचालनालय, मुंबई यांच्या दि. १८.८.२०११ चे मार्गदर्शक तत्वाच्या अधिन राहुन सभेने मंजुरात प्रदान करण्यांस हरकत नाही तसेच कॉंक्रिटीकरण ,प्लेवीगब्लॉक बसविणे इत्यादी कामे जिल्हा आरोग्य अधिकारी यांचे मान्यतेनेच करण्यांत यावे व मा. उपसंचालक आ.से अकोला मंडळ अकोला यांची परवानगी प्रप्त झाल्याशिवाय बांधकामाची कार्यवाही करण्यांत येउ नये तसेच प्रथम कामे मुख्य

इमारत बांधकाम करावे व त्यानंतरच निधी उपलब्धतेच्या अटिच्या अधिन राहुन या कार्यालयांचे परवानगीनुसार कामे हाती घेण्यांत यावी. तसेच आवारभिंतींचे बाहेर कोणतेही काम करता येणार नाही मार्गदर्शक तत्वानुसार दुरूस्तीची कामे वगळुन उपकेंद्र मुख्य इमारत बांधकामाची मा. संचालक आरोग्य सेवा संचालनालय मुबई यांच्या पुर्वपरवानगीसाठी व आवारंभित /संरक्षण भितींचे प्राकलन मा. उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ अकोला यांची पुर्वपरवानगी साठी पाठविण्यांत येईल त्यामुळे मुख्य इमारत बांधकाम व वॉलकम्पांड बांधकामाच्या कुठल्याही कामा बाबत मा. संचालक आरोग्य सेवा संचालनालय मुंबई व मा.उपसंचालक आरोग्य सेवा अकोला मंडळ अकोला यांची परवानगी प्राप्त झाल्याशिवाय बांधकामाची कार्यवाही करण्यांत येउ नये व का.अ.बा.वि.क्रं १ व २ यांनी प्रशासकिय मान्यतेसाठी सादर केलेल्या प्रकलनाच्या बाबतीत सदर काम आवश्यक आहे असा अभिप्राय सबधीत वै.अ यांनी दिलेला आहे..अशी माहिती सचिव तथा जि.आ.अ यांनी सभागृहांत दिली.

वरील विषयावर सभागृहांत सविस्तर चर्चा होउन मा,सभापती यांनी खालील ठरांव मांडला

<u>ठरांव कमांक १०</u>:– कार्यकारी अभियंता बा.वि.क १ व २ यांचे कडुन प्राप्त झालेल्या एकुण ३ प्राकलनास निधी उपलब्धतेला अधिन राहुन व शासनांचे मार्गदर्शक तत्वानुसार सदर समिती ही उपरोक्त बाबीला अनुसरून बांधकाम विभागांने सादर केलेल्या प्राकलनांस केवळ प्रशासकिय मान्यता प्रदान करित आहे तसेच सन २०१४–१५ या आर्थीक वर्षात प्राप्त होणा–या निधीच्या तसेच प्रथम कामे मुख्य इमारत बांधकाम करावे व त्यानंतरच निधी उपलब्धतेच्या अटिच्या अधिन राहुन या कार्यालयांचे परवानगीनुसार कामे हाती घेण्यांत यावी. या अटिवरच बांधकाम विभाग क्रं १व २ यांचे कडुन प्राप्त झालेल्या एकुण प्राकलनास जिल्हा वार्षीक योजनाच्या मार्गदर्शक तत्वानुसार व निधी उपलब्धतेला अधिन राहुन ही सभा प्रशासकिय मंजुरात प्रदान करते ठरावावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठराव सर्वानुमते मंजुर करण्यात आला.

<u>—:मा.सभापती यांचे पुर्वपरवानगीने वेळेवर येणारे इतर विषय:—</u>

<u>विषय क.१४ :– आरोग्य विभाग जि.प. यवतमाळ येथील औषधी भांडार विभागा करिता जिल्हा परिषद, अंतर्गत उपलब्ध असलेली जागा तसेच वेअर हाउस (गोडाउन) बांधुन देणे बाबत व मान्यता प्रदान करणे बाबत</u>

सचिव तथा जिआअ यांनी सदर विषयाबाबत सविस्तर माहिती सादर केली की,आरोग्य विभगाअंतर्गत ६३प्राथमिक आरोग्य केंद्र,४३५ उपकेंद्र ,१९आयुर्वेदिक दवाखाने,१प्राथमिक आरोग्य पथक,२सामान्य फिरते पथक ,५आदीवासी फिरते पथक ,१मोफिसिएल दवाखाने कार्यरत आहेत.सदरच्या दवाण्या करिता शासना मार्फत औषधी सामुग्री पुरवठा खरेदी करिता अनुदान प्राप्त होते. तसेच विविध आरोग्य योजनाअंतर्गत आरोग्य मोहिम राबवित असल्यांने संचालक,आरोग्य सेवा स्तरावरून औषधी सामुग्रीसाठी पुरवठा होत असतो.सदरचा औषधी सामुग्री पुरवठा साठवुन ठेवणे करिता आरोग्य विभाग ,जिल्हा परिषद, यवतमाळ यांचेकडे चांगल्या प्रकारचे तसेच मोठे गोडावुन (वेअर हाउस)उपलब्ध नसल्यांने औषधी साठा, साठवणुक करणे व शासनाच्या प्रचलित पध्दतीने वितरीत करणे शक्य नसल्यांने वेळोवेळी इतर ठिकाणी औषधी सामुग्री पुरवठा साठा ठेवावा लागतो.यामध्ये औषधी साठयांची परिक्षणा बाबत अन्न व प्रशासन विभागा कडुन विचारणा होउन औषध साठा अप्रमाणित होउ शकण्यावी शक्यता नाकारता येत नाही.

महाराष्ट्र शासन तसेच फार्मसी कौन्सील ऑफ इंडिया ॲक्ट १९४८ अन्वये औषधी साठा सांभाळणे व वितरीत करणे याबाबत औषध साठा कसे ठेवावयाचे याबाबत नियमावली ठरली असल्यांने सदरचा औषधी साठा योग्य ठिकाणी व योग्य तापमांनात ठेवणे गरजेचे आहे.जेणेकरून रूग्णांस चांगल्या प्रकारे सदरील औषधीचा योग्य परिणाम होईल जेणे करून सदरची औषधीचा परिणाम गरीब जनतेस अथवा गंभीर आजार असलेल्या रूग्णांस उपयोगांत येईल.

याआधी जिल्हा परिषद, तसेच महाराष्ट्र शासन आरोग्य सेवा ,मुबई यांना वेळोवेळी वेअर हाउस उपलब्ध करून देणे बाबत कळविण्यांत आले आहे.परंतु यवतमाळ जिल्हा परिषद, यांनी आजपर्यंत जागा अथवा वेअर हाउस (गोडावुन) उपलब्ध करून देण्यांत आले नाही.तसेच एनआरएचम अंतर्गत वेळोवेळी वेअर हाउस (गोडावुन) उपलब्ध करून देण्याबाबत मागणी असतांना एनआरएचएम यांचे कडुन जिल्हा परिषद, अंतर्गत असलेल्या जागेत बांधकामा करिता लागणारे अनुदान उपलब्ध करून देण्यांस समर्थ नसुन फक्त दुरूस्ती व परिरक्षण करणे बाबत अवगत केले असुन दुरूस्ती करिता अनुदान देण्यांस तयार आहे.

तेंव्हा जिल्हा परिषद,यवतमाळ अंतर्गत उपलब्ध असलेली जिल्हा परिषद,आवारातील जागेवर अथवा जिल्हा परिषद,कृषी व दुग्ध विभागाच्या जागेवर आरोग्य विभागाची औषधी सामुग्री साठा ठेवण्या करिता वेअर होउस (गोडावुन) करिता जागा उपलब्ध करून देण्यांत यावी तसेच जिल्हा परिषद,यवतमाळ बांधकाम विभाग क्रमांक १ अन्वये सदरची कामे सोपविण्यांत यावे तसेच सदरचे बांधकाम करण्या करिता जिल्हा नियोजन समिती मार्फत अनुदान प्राप्त करून द्यावे अशी माहिती सादर करून सदर प्रस्तांव आरोग्य विषयक समिती समोर, सदर विषयासं जि.प. चे सर्वसाधारण सभेची मान्यता घेण्या करिता सादर करण्यांत येत आहे.

यावर सभागृहांत सविस्तर चर्चा होउन मा. अध्यक्षांनी खालील प्रमाणे ठरांव मांडला

ठरांव क्रमांक ४ :— जिल्हा परिषद, यवतमाळ अंतर्गत असलेली जिल्हा परिषद, आवारांतील जागेवर अथवा जिल्हा परिषद, कृषि व दुग्ध विभागाच्या जागेवर आरोग्य विभागांची औषधी सामुग्री साठा ठेवण्या करिता वेअर होउस (गोडावुन) करिता जागा उपलब्ध करून देण्यांस तसेच जिल्हा परिषद,यवतमाळ बांधकाम विभाग क्रमांक १ अन्वये सदरची कामे सोपवुन सदरचे बांधकाम करण्या करिता जिल्हा नियोजन समिती मार्फत अनुदान प्राप्त करून देणे करिता सदर प्रस्तांवास जि.प. चे सर्वसाधारण सभेत ठेवण्या करिता हि आरोग्य समिती सभा शिफारसीस्तव मंजुरात प्रदान करते.

ठरांवावर कोणतीही उपसुचना आली नाही व ठरांव सर्वानुमते मंजुर करण्यांत आला

___शेवटी उपस्थित सन्मा.सदस्य व अधिकारी यांनी सभेच्या कामकाजांस भाग घेउन सहकार्य केल्या बाबत उपस्थितांचे आभार मा. सभापती आरोग्य समिती यांचे परवानीने सभा संपल्यांचे सचिव तथा जिआअ यांनी जाहीर केले.

सचिव तथा
जिल्हा आरोग्य अधिकारी
जिल्हा परिषद,यवतमाळ

अध्यक्ष
आरोग्य समिती
जिल्हा परिषद, यवतमाळ